ePaper
पाकिस्तान-अफगाणिस्ताव तणाव शिगेला; जलालाबादमध्ये जेट कोसळले

वर्ष - 9 I अंक - 184 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 01 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला गती


## 7.6% विकासदरासह जीडीपी मध्ये वाढ

# आर्थिक आघाडीवर भारताचा ‘पॉवर-प्ले’

**महाईन्यूज I नवी दिल्ली**

**भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल सर्वांनाच चकित करणारी आकडेवारी समोर आली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 50% इतके भरमसाठ टॅरिफचा भार टाकूनही भारतीय अर्थव्यवस्थेने तिसऱ्या तिमाहीत दमदार कामगिरी केली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत (ऑक्टोबर-डिसेंबर) देशाचा आर्थिक विकास दर 7.8% होता.**

जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेने चांगली कामगिरी केली असून प्रभावी जीडीपी वाढीमागे उत्पादन, सेवा आणि गुंतवणूक क्रियाकलापांमधील सुधारणा प्रमुख घटक मानले जात आहेत.



त्याचवेळी, केंद्र सरकारने संपूर्ण आर्थिक वर्ष 2025-26 (आर्थिक वर्ष 26) साठी 8.6% च्या नाममात्र जीडीपी वाढीचा अंदाज वर्तवला आहे. नाममात्र जीडीपीमध्ये महागाईचा प्रभाव देखील आहे, म्हणून हा आकडा सरकारच्या महसुली स्थितीसाठी महत्त्वाचा मानला जातो. उच्च नाममात्र वाढीमुळे कर संकलन वाढण्याची आणि फायनान्शिअल व्यवस्थापनाला मदत होऊ शकते.

याआधी दुसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी विकास दर 7.6% होता, जो चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत 8.2% होता. रिझर्व्ह बँकेने तिसऱ्या तिमाहीत सुमारे 6.8% दर वाढीचा अंदाज वर्तवला होता, तर सरकारच्या वित्त विभागाने सुमारे 7% वाढीचे भाकीत केले होते. तिसऱ्या तिमाहीचे GDP निकाल 2022-23 आर्थिक वर्षाला आधार वर्ष म्हणून वापरून तयार केले गेले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (MOSPI) दर पाच वर्षांनी आधार वर्ष सुधारत आहे.

सरकारने म्हटले आहे की नवीन मालिकेत जीडीपी डेटा, कॉर्पोरेट वित्तीय अहवाल, सर्वेक्षणे आणि डिजिटल आर्थिक क्रियाकलापांसह विस्तृत स्त्रोतांचा समावेश आहे, ज्यामुळे GDP आकड्यांची अचूकता आणि व्यापकता वाढते. हा बदल आर्थिक विश्लेषण अधिक वास्तववादी आणि समकालीन आर्थिक संरचनांशी संबंधित बनवतो.

### मजबूत अर्थव्यवस्थेवर सरकारचा भर

या दरम्यान, अर्थ मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार एप्रिल-जानेवारी कालावधीतील वित्तीय तूट 15.585 लाख कोटींच्या सुधारित पूर्ण वर्षाच्या लक्ष्याच्या 63% पर्यंत पोहोचली आहे. आर्थिक वर्षाच्या या टप्प्यावर ही तूट सामान्यतः संतुलित मानली जात आहे, जे सरकार खर्च आणि महसूल यांच्यात संतुलन राखण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दर्शवते.



# अजितदादांच्या विमान अपघातावर पडदा!

**महाईन्यूज I मुंबई**



**अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झालं. आज त्यांच्या विमान अपघाताला एक महिना पूर्ण झाला आहे. अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत रोहित पवारांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक सवाल उपस्थित करत घातपाताची शंका उपस्थित केली होती.**

दरम्यान, आता अजित पवार यांच्या विमान अपघाताचा एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो अर्थात एएआयबीचा (AAIB) प्राथमिक चौकशी अहवाल समोर आला आहे. हा अहवाल तब्बल २२ पानांचा प्राथमिक अहवाल आहे. या अहवालात अजित पवारांच्या विमान अपघाताची संभाव्य काही कारणे सांगण्यात आली आहेत. या अहवालात फक्त प्राथमिक निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोने प्राथमिक अहवालात कमी दृश्यमानता, सुरक्षा त्रुटी आणि VFR (VISUAL FLIGHT RULES) नियमांचे उल्लंघन, एअरफिल्ड अपुऱ्या सुविधा, बारामतीत अधिकृत किंवा स्वतंत्र MET सुविधा नाही, अशा त्रुटींकडे या अहवालात बोट ठेवण्यात आलं आहे.

### प्राथमिक अहवालात काय निष्कर्ष मांडले?

- दुष्यमानता VFR मर्यादेपेक्षा कमी असतानाही लँडिंगचा प्रयत्न.
- एअरफिल्ड सुविधांचे अपुरे मानक.
- बारामतीत अधिकृत किंवा स्वतंत्र MET सुविधा नाही
- हवामान आणि मूलभूत नेव्हिगेशन सहाय्यांमध्ये कमतरता.
- टेबल-टॉप रनवे – फिकट मार्किंग.

### विमान झाडावर आदळलं

अजित पवार यांचं विमान मुंबईवरून बारामतीत लँडिंग करत असताना धावपट्टी ११ वर पहिल्यांदा लँडिंगचा प्रयत्न केला गेला. मात्र, पहिल्या प्रयत्नात गो-अराऊंड करण्यात आले. त्यानंतर पायलटने विमान दुसऱ्यांदा लँडिंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा लँडिंग क्लिअरन्सनंतर काही वेळातच हे विमान धावपट्टीच्या डावीकडे सुमारे ५० मीटर अंतरावर झाडांवर आणि भूभागावर आदळलं आणि त्यानंतर आगीत ते जळून खाक झालं, असं एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोने प्राथमिक अहवालात म्हटलं आहे. दरम्यान, फ्लाईट डेटा रेकॉर्डर खराब झाला. मात्र, रॉ डेटा डाऊनलोड करण्यात आला असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. तसेच CVR/FDR सविस्तर विश्लेषणानंतर या अपघाताचं कारण समोर येईल, असंही अहवालात म्हटलं आहे.

# आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला गती

## भूसंपादन व शेतकऱ्यांना परताव्याचे निर्णय; 3,000 एकर जमीन संपादन

महाईन्यूज । पुणे

**दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या कामाला अखेर वेग येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. मार्चच्या पहिल्या पंधरवड्यात भूसंपादनाच्या पॅकेजवर शिक्कामोर्तब करून पैसे वाटप करण्याच्या हालचाली प्रशासनाने सुरू केलेल्या आहेत.**



राज्य सरकार व केंद्राच्या पातळीवरील समन्वयानंतर जमीन संपादन, पर्यावरणीय परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रियांना गती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित विभागांना ठोस कालबद्ध कार्यक्रम सादर करण्यास सांगितले आहे. सध्या पुणे जिल्ह्यातील पुणे शहरातील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षमतेच्या मर्यादेवर कार्यरत आहे. वाढती प्रवासीसंख्या आणि औद्योगिक गुंतवणूक लक्षात घेता नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची गरज अधोरेखित होत आहे. पुरंदर तालुक्यात प्रस्तावित हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पुणे, सातारा, सोलापूरसह दक्षिण महाराष्ट्राला मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारकडून नियमित आढावा बैठका घेऊन प्रकल्पातील अडथळे दूर करण्यावर भर दिला जाणार असून, येत्या काही महिन्यांत प्रत्यक्ष कामाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, जमीन संपादनासाठी आवश्यक निधीची तरतूद टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंका-आक्षेपांचे निरसन करण्यावर भर दिला जाणार आहे. प्रकल्पग्रस्तांना मोबदला आणि पुनर्वसनाची हमी देण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### कर्जासाठी सरकारची मंजुरी

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी तालुक्यातील पारगाव, कुंभारवळण,एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाची वाडी, वनपुरी या सात गावांमधील जमिनींचे संपादन केले जाणार आहे. विमानतळासाठी सुमारे तीन हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार असून, भूसंपादनाचा प्रस्ताव सरकारला पाठविण्यात आला आहे. भूसंपादन करण्यापूर्वी शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी सहा हजार कोटी रुपयांच्या रकमेची आवश्यकता असून, ती कर्जस्वरूपात उभारण्यास राज्याच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

### शेतकऱ्यांना मिळणार जागा

प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्यापोटी देण्यात येणारी जागा कोठे देणार, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभमावस्था आहे. त्यासंदर्भात विचारणा सातत्याने जिल्हा प्रशासनाकडे केली जात आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना परताव्यापोटीची जागा विमानतळालगतच्या एरोसिटीमध्येच दिली जाईल, असे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. हुडको या संस्थेकडून ही रक्कम कर्ज स्वरूपात घेतली जाणार आहे.

# पुण्यातील खासगी सोसायटीच्या 'या' प्रकल्पांना 'सेन्सर' बसविणार!

महाईन्यूज । पुणे

**शहरातील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी होणारे हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने सेन्सर बसविणे बंधनकारक केले आहे. त्याच प्रमाणे नदीत सोडले जाणारे मैलापाणी किती प्रदूषित आहे, हे लक्षात यावे आणि प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांमधील खासगी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांवर (एसटीपी) देखील सेन्सर बसविण्याचा विचार प्रशासनाने सुरु केला आहे.**




शहरातून वाहत असलेल्या मुळा-मुठा नदीचे पाणी शुद्ध रहावे, यासाठी महापालिका विविध प्रकल्प राबवित आहे. यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी देखील खर्च केला जातो. नदीत पाणी सोडताना त्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने शहराच्या विविध भागात मैलापाणी शुद्धीकरण केंद्र सुरु केली आहेत.

तसेच शहरातील मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांनी सांडपाणी शुद्ध करण्यासाठी छोट्या आकारातील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणे महापालिकेने बंधनकारक केले आहे. त्या प्रकल्पात प्रक्रिया करुन त्यानंतर हे पाणी संबधित गृहनिर्माण सोसायटीने नदीत सोडणे आवश्यक आहे. मात्र काही सोसायट्यांचे प्रकल्प बंद अवस्थेत असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर खासगी सोसायट्यांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पात पाण्यावर किती प्रक्रिया होते, हे तपासण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या प्रकल्पांवर डिजिटल नजर ठेवण्याची तयारी महापालिका प्रशासनाने केली आहे. बांधकाम प्रकल्पांवर लावण्यात आलेली सेन्सर प्रणाली या प्रकल्पांवर लावून त्यावर लक्ष ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यामुळे हे प्रकल्प सुरू आहेत की नाही? तसेच पाणी किती शुद्ध होते? याची सविस्तर माहिती महापालिकेला एका क्लिकवर मिळणार आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी दिली.

शहरातील विविध भागांमध्ये सर्वसाधारण ७५० पेक्षा अधिक खासगी एसटीपी प्रकल्प सुरु आहेत. नव्या नियमानुसार १०० पेक्षा जास्त फ्लॅट्स असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये एसटीपी बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अनेक ठिकाणी एसटीपी बसवले असले तरी ते नियमितपणे सुरू ठेवले जातात का? त्यांची देखभाल योग्य प्रकारे केली जाते की नाही? तसेच त्यांच्याकडून शुद्ध केले जाणारे पाणी निकषांनुसार आहे का? याची संपूर्ण माहिती यामुळे महापालिकेला समजणार आहे. नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत योजने अंतर्गत शहरात विविध सांडपाणी प्रकलपांचे कामे सुरू आहे. यातील ५ प्रकल्प येत्या काही महिन्यात पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज म्हणाले, खासगी सोसायट्यांमधील एसटीपी प्रकल्पांना सेन्सर प्रणाली लावल्यामुळे प्रकल्पातील पाण्याचा प्रवाह, प्रक्रिया स्थिती आणि गुणवत्ता याबाबतची माहिती थेट महापालिकेला मिळणार आहे. यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोसायट्यांवर कारवाई करणे सोपे होईल. यामुळे पाणी पुनर्वापराला चालना मिळणार असून नदी-नाल्यांमधील प्रदूषणाला आळा बसेल.

# शहराच्या वीज सक्षमीकरणाला "बुस्टर"

## राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन; आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवडसह भोसरी विधानसभा मतदारसंघातीलवाढत्या औद्योगिक व निवासी वीज समस्यांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र शासन सकारात्मक आहे. नवीन प्रस्तावित विकासकामे आणि पायाभूत प्रकल्पांसाठी आवश्यक निधीची पूर्तता करण्यात येईल. तसेच, वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी दिले.**



श्री. महेश (दादा) किसन लांडगे

महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने नियम १०५ अंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील वीज पुरवठा सक्षमीकरणाच्या अनुशंगाने विविध मागण्याची लक्षवेधी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी सभागृहात मांडली. त्याला मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांनी लेखी उत्तर दिले आणि वीज यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती देण्याचे संकेत दिले.

गणेशखिंड शहर मंडळांतर्गत भोसरी, चहोली, मोशी, तळवडे, चिखली आदी भागांमध्ये सध्या औद्योगिक, व्यावसायिक व निवासी अशा एकूण ४,५३,८२० ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यामध्ये ५८० उच्चदाब ग्राहक आहेत. महापारेषणच्या चार २२० के.व्ही. उपकेंद्रांद्वारे भोसरी आर एस-१ (२७५ एम.व्ही.ए.), भोसरी आर एस-२ (१५० एम.व्ही.ए.), टेल्को (१५० एम.व्ही.ए.), चिंचवड आर एस (२३० एम.व्ही.ए.) : एकूण ८०५ एम.व्ही.ए. स्थापित क्षमता उपलब्ध असून सध्याची मागणी ६२७ एम.व्ही.ए. पर्यंत पोहोचली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे भविष्यातील ताण लक्षात घेता अतिरिक्त पायाभूत सुविधा उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. २०० केव्ही मोशी आणि २०० केव्ही चऱ्होली येथे उपकेंद्र तयार केली आणि प्रस्तावित सदरची कामे पूर्ण केल्यानंतर वीज समस्या सोडवण्यास मदत होईल, असेही बोर्डीकर- साकोरे यांनी म्हटले आहे.

### वीज चोरीच्या प्रकारांना लगाम घाला...

कुदळवाडी परिसरात भारतातील सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे 900 एकर क्षेत्र रिकामे करण्यात आले. कुदळवाडीच्या जवळपास 5 हजार अवैध मिळकती होत्या. त्या परिसरात केवळ 900 अधिकृत वीज कनेक्शन होते. अनधिकृत वीज कनेक्शन 3 हजार 800 हून अधिक होती. याची नोंद महावितरणकडे आहे. वीज चोरीच्या प्रकारांना लगाम घातला पाहिजे. नवीन केबल, वीज कर्मचाऱ्यांचा अभाव, देखभाल-दुरूस्तीची कामांत दिरंगाई अशा समस्या आहेत. त्यावर ठोस उपायोजना करण्यासाठी लघु उद्योजक संघटना, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे केली. यावर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर- साकोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

### नव्या उपकेंद्रांना हिरवा कंदील...

ऊर्जा विभागाच्या माहितीनुसार पुढील प्रकल्पांना गती दिली जाणार आहे: सफारी पार्क, मोशी येथे अतिउच्चदाब (EHV) उपकेंद्र — मोशी, डुडुळगाव, आकुर्डी, चिखली, तळवडे परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर होणार आहे. चहोली येथे नवीन EHV उपकेंद्र — भोसरी, चहोली, दिघी, धानोरी भागात पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होणार आहे. सेंच्युरी इंका EHV उपकेंद्रात दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचा प्रस्ताव — भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा. मध्यम दाब स्विचिंग स्टेशनसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

### भूमिगत वीजवाहिन्यांचा महत्त्वाकांक्षी आराखडा

भोसरी गावठाणातील ओव्हरहेड वीजवाहिन्या आरडीएसएस योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने भूमिगत करण्यात येणार आहेत. तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फीडर व भूमिगत केबल टाकण्याचे काम तातडीने हाती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वारंवार होणारे वीजखंडित प्रकार कमी होतील. औद्योगिक उत्पादनात सातत्य राहील. निवासी भागात सुरक्षित आणि स्थिर वीजपुरवठा मिळेल. विशेष म्हणजे, वाढत्या शहरीकरणाचा विचार करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक असून संबंधित प्रस्तावांना प्राधान्याने मान्यता देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

# स्थायी समिती अध्यक्षपदी अभिषेक बारणे यांची बिनविरोध निवड

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समिती अध्यक्षपदी अभिषेक बारणे यांची बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) अर्ज दाखल केला नव्हता. बारणे यांचा एकमेव अर्ज होता. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बारणे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. भाजपने महापालिका तिजोरीची चावी बारणे यांच्या हाती सोपविली आहे.**



स्थायी समिती अध्यक्षपदासाठी २५ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. सत्ताधारी भाजपकडून स्थायी समिती अध्यक्षपदासाठी अभिषेक बारणे यांच्याबरोबर वाकडचे प्रतिनिधीत्व करणारे संदीप कस्पटे, रहाटणीतून दुसऱ्यांदा निवडून आलेले बाबा त्रिभुवन यांच्यात चुरस होती. परंतु, पक्षश्रेष्टींनी बारणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार अभिषेक बारणे यांनी २५ फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल केला होता. त्यांचा एकमेव अर्ज असल्याने बिनविरोध निवड निश्चित होती. अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी शनिवारी (२८ फेब्रुवारी) स्थायी समितीच्या सदस्यांच्या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता महापालिका मुख्यालयात निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. बारणे यांच्या अर्जाची छाननी केली. त्यात त्यांचा अर्ज पात्र ठरला. बारणे यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची स्थायी समिती अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे कौर यांनी जाहीर केले.

स्थायी समितीमध्ये भाजपचे ११, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे चार आणि शिवसेना (शिंदे) पक्षाचा एक सदस्य आहे. १६ सदस्यीय स्थायी समितीत भाजपचे भाजपचे बहुमत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्याने उमेदवारी अर्ज दाखल केला नव्हता. परिणामी, बारणे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे.

### कोण आहेत अभिषेक बारणे?

महापालिका तिजोरीच्या चाव्या हाती घेणारे अभिषेक बारणे दुसऱ्यांदा भाजपकडून निवडून आले आहेत. थेरगाव भागाचे ते महापालिकेत प्रतिनिधीत्व करतात. मागील पंचवार्षिकमध्ये बारणे यांनी स्थायी समितीचे सदस्य म्हणून काम केले आहे. 'ग' प्रभागाचे अध्यक्षपदी त्यांनी भूषविले आहे. आमदार शंकर जगताप यांचे अतिशय निकटवर्तीय अशी बारणे यांची ओळख आहे.



## भूमिका

# सुनेत्राताईंची कसोटी

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची झालेली निवड अपेक्षित असली, तरी ती तितकीच आव्हानात्मक आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या प्रभावी नेतृत्वानंतर पक्षाची धुरा सांभाळणे म्हणजे मोठे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे.**

विशेषतः अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढणे आणि विखुरलेल्या कार्यकर्त्यांना एकत्र आणणे, हे सुनेत्राताई पुढील प्रमुख आव्हान ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे नेतृत्व पुढील काही वर्षांत कसोटीवर लागणार, हे निश्चित.



अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात नेतृत्वाचा प्रश्न गंभीर झाला होता. प्रफुल्ल पटेल किंवा इतर वरिष्ठ नेत्यांची नावे पुढे आली, मात्र कार्यकर्त्यांमध्ये त्याबाबत एकमत नव्हते. पक्षातील काही नेत्यांची भाजपाशी वाढती जवळीकही कार्यकर्त्यांच्या शंकेचे कारण ठरली होती. अशा स्थितीत सुनेत्रा पवार यांची निवड ही समन्वयाचा मार्ग म्हणून पुढे आली. कुटुंबीय वारसा, कार्यकर्त्यांचा भावनिक आधार आणि नव्या नेतृत्वाची गरज यांचा तो समतोल म्हणता येईल.

सुनेत्राताईंनी अध्यक्षपद स्वीकारताना पुरोगामी विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला. शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर यांची विचारधारा ही पक्षाची ओळख राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी यांसारख्या स्त्री नेतृत्वाचा उल्लेख करून त्यांनी वैचारिक आणि सांस्कृतिक भूमिकेची जाणीव करून दिली. यामुळे त्यांच्या भाषणातून धोरणीपणा आणि विचारांची स्पष्टता दिसून आली.

पवार घराण्याचा राजकीय वारसा लक्षात घेतला, तर सुनेत्राताईंना राजकारण नवीन नाही. शारदाबाई पवार यांच्यापासून सुरू झालेली पुरोगामी परंपरा या कुटुंबात खोलवर रुजलेली आहे. समाजकारण, जनसंपर्क आणि संघटन कौशल्याचा हा वारसा त्यांना लाभला आहे. मात्र वारसा असणे आणि तो सक्षमपणे पुढे नेणे यात फरक असतो. आजची राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची असून त्यासाठी नवे कौशल्य आवश्यक आहे.

सध्याचा महाराष्ट्राचा राजकीय पट अत्यंत क्लिष्ट आहे. भाजप, काँग्रेस, शिवसेनेचे दोन गट, राष्ट्रवादीचे दोन प्रवाह आणि इतर छोटे पक्ष अशा बहुपक्षीय समीकरणांमध्ये राष्ट्रवादीला स्वतःची जागा टिकवावी लागणार आहे. अजित पवार यांच्या काळात विलीनीकरणाच्या चर्चांना ऊत आला होता; मात्र त्यांच्या निधनानंतर हा मुद्दा मागे पडलेला दिसतो. दुसरीकडे शरद पवार यांच्या प्रकृतीची अनिश्चितता लक्षात घेता दोन्ही राष्ट्रवादी गट संक्रमणातून जात असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर सुनेत्राताईंना दुहेरी आव्हानांचा सामना करावा लागेल — एक म्हणजे पक्षातील अंतर्गत मतभेद सांभाळणे आणि दुसरे म्हणजे बाह्य राजकीय दबावांना तोंड देणे. सैरभैर झालेल्या कार्यकर्त्यांना दिशा देणे, संघटन पुनर्बांधणी करणे आणि नव्या पिढीला आकर्षित करणे, ही त्यांची प्राथमिकता असायला हवी. केवळ भावनिक आधारावर नव्हे, तर ठोस संघटन आणि स्पष्ट धोरणांवर पक्ष उभा करावा लागेल.

सध्या राज्यात तातडीच्या निवडणुका नसल्या, तरी 2029 नंतरचा निवडणूक काळ निर्णायक ठरणार आहे. भाजप स्वबळाचा पवित्रा घेतल्यास राजकीय समीकरणे अधिक बदलू शकतात. अशा वेळी सुनेत्राताईंना स्वतंत्र नेतृत्व सिद्ध करावे लागेल. इतिहासात इंदिरा गांधींपासून ममता बॅनर्जींपर्यंत अनेक महिला नेत्यांनी कठीण परिस्थितीत पक्ष उभे केले आहेत. त्या परंपरेत स्वतःचे स्थान निर्माण करण्याची संधी सुनेत्राताईंना आहे.

एकूणच, सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व हे केवळ पदाचा वारसा नाही, तर जबाबदारीची मोठी परीक्षा आहे. विचारांची स्पष्टता, संघटन कौशल्य आणि निर्णायक नेतृत्व या त्रिसूत्रीवरच त्यांचे यश अवलंबून राहील. आगामी काळच त्यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी ठरवेल.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

***एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली. तेव्हा देवाला हसू आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला.***

तो पाण्यावर पडताच पाणी उसळले. ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्याच्यावर चढले व उड्या मारू लागले. मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली. ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

तात्पर्य :

देवाने ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधानी असावे.

**एपस्टिन प्रकरण हे आधुनिक जगातील सत्तेच्या आणि संपत्तीच्या विकृत संगनमताचे भयावह उदाहरण ठरले आहे. एका व्यक्तीच्या गुन्ह्यांपलीकडे जाऊन हे प्रकरण जागतिक उच्चभ्रू समाजातील नैतिक अधःपतन उघड करणारे आहे.**

# एपस्टिनचा दंशकाल आणि उपसर्ग

एपस्टिन फाईल्समधून राजकारणी, उद्योगपती, सेलिब्रिटी आणि प्रभावशाली व्यक्तींशी त्याचे असलेले संबंध समोर आल्याने जगभरात खळबळ उडाली. या उघडकींनी सत्तेच्या आड दडलेल्या शोषणाचे विदारक वास्तव समोर आणले.




जेफ्री एपस्टिनने संपत्ती आणि प्रभावाच्या जोरावर स्वतःभोवती अभेद्य जाळे निर्माण केले. देणग्या, मेजवान्या आणि प्रतिष्ठित संबंधांच्या माध्यमातून त्याने उच्चभ्रू वर्तुळात प्रवेश मिळवला. या प्रभावाच्या आड़ून महिला आणि अल्पवयीन मुलींचे योजनाबद्ध शोषण करणारी यंत्रणा उभी राहिली. शिक्षण, करिअर किंवा आर्थिक मदतीची आमिषे दाखवून मुलींना जाळ्यात ओढले जाई आणि नंतर प्रभावशाली व्यक्तींच्या धाकाने त्यांना गप्प बसवले जाई.

या प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे दीर्घकाळ न्यायप्रक्रियेपासून त्याची सुटका होत राहिली. पैशांचा आणि संबंधांचा वापर करून तपासावर परिणाम झाल्याच्या आरोपांनी न्यायव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. मात्र पीडितांच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळे आणि धाडसी पत्रकारितेमुळे प्रकरण पुन्हा समोर आले. 2019 मध्ये तुरुंगात त्याचा मृत्यू झाला, तरी त्यामागील रहस्य आणि संपूर्ण सत्य उलगडण्याची मागणी कायम आहे.

एपस्टिन फाईल्समुळे अनेक नामांकित व्यक्तींची नावे चर्चेत आली आणि जागतिक पातळीवर नैतिकतेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. मुद्दा केवळ व्यक्तींच्या सहभागाचा नाही, तर अशा प्रवृत्तींना पोषक ठरणाऱ्या सामाजिक रचनेचा आहे. महिला सक्षमीकरणाचा जयघोष करणाऱ्या समाजात असे अमानवी जाळे कसे फोफावते, हा मूलभूत प्रश्न या प्रकरणाने उपस्थित केला आहे.

या प्रकरणाचा खरा धडा म्हणजे सत्तेवर नैतिकतेचे नियंत्रण आवश्यक आहे. कायदा, समाज आणि जागरूक नागरिक यांची संयुक्त जबाबदारीच अशा घटनांना आळा घालू शकते. अन्यथा एखादा एपस्टिन संपेल, पण त्याची प्रवृत्ती नव्या रूपात पुन्हा उभी राहण्याचा धोका कायम राहील. त्यामुळे एपस्टिन प्रकरण हे केवळ एक गुन्हेगारी कथा नसून जागतिक समाजासाठी कठोर इशारा आहे.

## || अभंगवाणी ||



नामे स्नानसंध्या केलें क्रियाकर्म ।
त्याचा भवश्रम निवारला ।।१।।

आणिके दुरावली करिता खटपट ।
वाउगे बोभाट वर्मांविण ।।२।।

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘लकी ड्रॉ’मध्ये कार जिंकणे भोवले!

## राज्यपालांच्या आदेशावरून निलंबन; सहाय्यक धर्मदाय आयुक्तांवर कारवाई

**महाईन्यूज । गोंदिया**

**शासनाची पूर्वपरवानगी न घेता ‘लकी ड्रॉ’मध्ये सहभाग घेत मोटार (महिंद्रा एसयूव्ही) जिंकणे गोंदियाच्या सहाय्यक धर्मदाय आयुक्त (परिविक्षाधीन) दिशा पजई यांना चांगलेच भोवले. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १२, १३ व १९ चा भंग केल्याच्या कारणावरून राज्याचे प्रधान सचिव व विधि परामर्शी यांनी राज्यपालांच्या आदेशावरून शिस्तभंगाची कार्यवाही करत त्यांना निलंबित केले. तसे पत्रही शुक्रवारी सायंकाळी निर्गमित करण्यात आले.**



नागपूर येथील एका प्रसिद्ध ज्वेलर्सतर्फे सोने खरेदीवर ‘लकी ड्रॉ’ योजना आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये पजई यांनी शासनाची पूर्वपरवानगी न घेता सहभाग घेतला. त्यांनी मोटार जिंकली व ज्वेलर्सतर्फे गोंदिया येथे नवीन प्रतिष्ठानच्या उद्‌घाटनाप्रसंगी मोटारीचा स्वीकारही केला. यावर राज्याचे प्रधान सचिव व विधि परामर्शी दिलीप शिवाजीराव घुमरे यांनी राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार पजई यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांना निलंबित केले. त्याचबरोबर हे आदेश अंमलात असेपर्यंतच्या कालावधीत त्यांना गोंदिया येथे मुख्यालय देण्यात आले. पूर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नसल्याचे आदेशात नमूद आहे.

### ...तर निर्वाह भत्ताही जाणार

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १६ च्या तरतूदी लक्षात घेता पजई यांना निलंबित असताना कोणत्याही प्रकारची खासगी नोकरी स्वीकारणे किंवा व्यवसाय करणे अनुज्ञेय राहणार नाही. तसे केल्यास त्यांना गैरवर्तणूकीसाठी दोषी समजले जाईल आणि उचित कारवाई करण्यात येईल. तसेच या काळात निर्वाह भत्त्यावर त्यांचा हक्क राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### तर्कवितर्कांना उधाण

‘लकी ड्रॉ’ योजनेवरून अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. पजई यांना मिळालेली मोटार थेट शोरूममधून आणलेली नव्हती, तर ती काही दिवसांपूर्वी खरेदी केली होती. नोंदणीनंतर मोटार धुतली गेली, शोरूममधील मोटारीसारखी सजवली गेली आणि नंतर पजई यांना सादर केली गेली, असा दावा काहींनी केला आहे. ज्वेलर्सचा मोफत प्रसिद्धीचा प्रस्ताव स्वीकारून त्यांना मोटार देण्यात आली, अशीही चर्चा आहे.

### मंत्रालयात तक्रारी

पजईंविरुद्ध मंत्रालयात विविध तक्रारी झाल्या आहेत. कर्तव्यावर असताना पजईंच्या कठोर कृतींबरोबरच विविध संस्थांवर दबाव आणल्याच्या चर्चाही शहरात गाजल्या. ‘लकी ड्रॉ’वरून त्यांचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी होते. या प्रकरणाच्या पुढील तपासात काय निष्पन्न होते, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

# मेढा आगारात प्रवाशांसाठी स्मार्ट कार्ड योजना सुरू : नीता बाबर

**महाईन्यूज । कुडाळ**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवास व्यवस्थेत मोठा डिजिटल बदल होत असून आता प्रवाशांना तिकिटाऐवजी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड वापरता येणार आहे. रोख व्यवहार कमी करून प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक करण्यासाठी ही योजना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी लागू केली असून मेढा आगारामध्ये स्मार्ट कार्ड योजनेचा शुभारंभ करण्यात आला असल्याची माहिती मेढा आगाराच्या व्यवस्थापक नीता बाबर यांनी दिली आहे. तसेच योजनेचा शुभारंभ करताच ग्रामिण भागातील महिलांचा कार्ड काढण्यासाठी उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.**







एस. टी. महामंडळाने पारंपरिक तिकिट पद्धतीला पर्याय देत एन. सी. एम. सी. प्रणाली स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. या कार्डद्वारे प्रवाशांना सवलतींची अचूक नोंद, रोखविरहित व्यवहार आणि प्रतिपूर्तीची स्पष्ट प्रक्रिया एकाच माध्यमातून मिळणार आहे. विविध सामाजिक सवलती घेण्यासाठी भविष्यात हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार असल्याचेही नीता बाबर यांनी स्पष्ट केले. त्यानुसार मेढा एस.टी. आगारांमध्ये कार्ड नोंदणी मोहीम सुरू झाली असून त्यासाठी प्रवाशांना बसस्थानकावर अर्ज करता येणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना व्यवस्थापक बाबर म्हणाल्या, या स्मार्ट कार्डचा लाभ विविध प्रवासी गटांना देण्यात येणार आहे. शालेय आणि तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड मिळणार आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवासी आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना आधार संलग्र कार्ड दिले जाणार आहे. दिव्यांग प्रवाशांसाठी युडीआयडी क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले मेढा बसस्थानकात कार्ड उपलब्ध होणार आहे.

अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालयांमार्फत कार्ड वितरित केले जाणार आहेत. कार्डची किंमत नवीन कार्डसाठी १९९ रुपये असून जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत कार्ड मिळेल. किमान १०० रुपये वॉलेट बॅलन्स आवश्यक असेल आणि ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज करता येईल तसेच ईटीआयएम मशीन, अधिकृत सातारा विभागचे संकेतस्थळ, मोबाइल ॲप किंवा नियुक्त एजंटकडून रिचार्जची सुविधा असेल. ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी बसस्थानकांवरच नोंदणीची सोय करण्यात आली आहे.

मेढा (जावली) बसस्थानकामध्ये स्मार्ट कार्ड देण्यास सुरुवात झाली असून महिला, ६५ वर्षावरील नागरिक, ७५ वर्षावरील नागरिक यांनी मेढा बसस्थानकामध्ये येवून आपले कार्ड काढून घ्यावे असे आवाहन मेढा आगाराच्या आगार प्रमुख नीता बाबर यांनी केले आहे.

# अमेरिका-इस्रायलचा इराणवर हल्ला!

## हल्ल्यात ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा इराणचा दावा

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर आज मोठे हवाई हल्ले केले आहेत, तर इराणनेही अमेरिका आणि इस्रायलला जोरदार प्रत्युत्तर देत प्रतिहल्ले केले आहेत. त्यामुळे आता अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध भडकलं आहे. इस्रायलने केलेल्या हल्ल्यात तेहरानमध्ये शनिवारी अनेक मोठे स्फोट झाले आहेत.**

इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर इराणच्या संरक्षणमंत्र्यांनी देशभरात आणीबाणीची घोषणा केली. दरम्यान इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आता एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे केलेल्या हल्ल्यात दक्षिण इराणमधील ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा दावा इराणने केला आहे.

इस्रायल-अमेरिकेने केलेल्या या हल्ल्यात इराणच्या मिनाबमधील किमान ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचं वृत्त IRNA या वृत्तसंस्थेच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. इराणच्या होर्मोज्गान प्रांतातील मिनाब येथे झालेल्या हल्ल्यात किमान ४५ जण जखमी झाले असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, या हल्ल्यात ४० शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याचा दावा इराणकडून करण्यात आला असला तरी याबाबत अमेरिका किंवा इस्रायलने अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.



### डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा



डोनाल्ड ट्रम्प यांनी हल्ल्यांनंतर दिलेल्या संदेशात म्हटले की, "इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड, सशस्त्र दल आणि सर्व पोलिसांना मी आज रात्री आवाहन करतो की तुम्ही तुमची शस्त्रे खाली ठेवा आणि पूर्ण शरणागती पत्करा. अन्यथा तुम्हाला निश्चित मृत्यूला सामोरे जावे लागेल. त्यामुळे शस्त्रे खाली ठेवा, शरणागती स्वीकारल्यास तुमच्याशी पूर्ण संरक्षणासह वागणूक दिली जाईल."

### 'तुमचे सरकार ताब्यात घ्या', ट्रम्प यांचे इराणी जनतेला आवाहन

- इराणची राजधानी तेहरानवर इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे हल्ला केल्यानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. आज सकाळी इराणच्या विविध शहरांवर क्षेपणास्त्र डागल्यानंतर त्यांनी या हल्ल्यामागे अमेरिका आणि इस्रायल यांचा सहभाग असल्याचे मान्य केले. ट्रुथ सोशल मीडियावर ट्रम्प यांनी एक सविस्तर व्हिडिओ शेअर केला. ज्यात त्यांनी इराणी जनतेलाही आवाहन केले आहे.
- डोनाल्ड ट्रम्प आपल्या निवेदनात इराणी जनतेला उद्देशून म्हणाले, "तुमच्या स्वातंत्र्याची वेळ जवळ आली आहे. युद्धादरम्यान सुरक्षित स्थळी आश्रय घ्या. तुमच्या घरातून बाहेर पडू नका. बाहेर सध्या धोका असेल. सर्वत्र बॉम्बचा वर्षाव होत असेल. जेव्हा आमचा हल्ला पूर्ण होईल. तेव्हा तुम्ही तुमचे सरकार ताब्यात घ्या. ते तुमचे स्वतःचे सरकार असेल."

# बोत्सवाना येथून भारतात चित्त्यांची तिसरी तुकडी दाखल

**महाईन्यूज । श्योपूर**

**चित्ता स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण अफ्रिकेतील बोत्सवाना येथून भारतात नऊ चित्ते दाखल झालेत. त्यांना मध्यप्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातील कुनो राष्ट्रीय उद्यानातील खुल्या कुंपणात सोडण्यात आले. यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये नामिबिया येथून पहिल्या तुकडीत भारतात आठ (पाच मादी, तीन नर) आणि फेब्रुवारी २०२३ मध्ये दुसऱ्या तुकडीत दक्षिण अफ्रिकेतून बारा चित्ते (सात नर, पाच मादी) आणले होते. भारतात आता चित्त्यांची संख्या ४८वर पोहोचली आहे.**








केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांनी सहा मादी आणि तीन नर चित्त्यांना अलग ठेवण्यासाठी कुंपणात सोडले, असे मध्य प्रदेशचे अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एल. कृष्णमूर्ती यांनी सांगितले. चार वर्षांच्या चित्त्यांच्या पुनरुज्जीवन योजनेचा भाग म्हणून आफ्रिकेतून चित्त्यांची तिसरी तुकडी भारतीय हवाई दलाच्या (आयएएफ) विमानाने सकाळी दाखल झाली. चित्त्यांना आधी बोत्सवानाहून ग्वाल्हेरला आयएएफ विमानाने पाठवण्यात आले आणि नंतर आयएएफ हेलिकॉप्टरने कुनोला नेण्यात आले.

आयएएफ चित्ते पुनरुज्जीवन कार्यक्रमाला मदत करत आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये नामिबियातून आणि फेब्रुवारी २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतून प्राणी नेण्यात आले होते, असे प्रोजेक्ट चित्ताचे संचालक उत्तम शर्मा यांनी सांगितले. अधिक चित्त्यांच्या आगमनामुळे पुनरुज्जीवन कार्यक्रमाला बळकटी मिळेल. केंद्र सरकारच्या पाठिंब्याने, आम्ही शक्य तितक्या लवकर त्यांची संख्या ५० पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवतो, असे ते म्हणाले. तीन चित्त्यांना गांधी सागर वन्यजीव अभयारण्यात स्थलांतरित करण्यात आले आहे, तर ३६ कुनो येथे आहेत, असे शर्मा म्हणाले.

संपूर्ण लोकसंख्या नष्ट करू शकणाऱ्या रोगांच्या प्रादुर्भावाच्या धोक्यामुळे धोक्यात असलेल्या प्राण्यांना सामान्यतः एकाच अधिवासात ठेवले जात नाही. जगातील सर्वात वेगवान भूमी प्राणी असलेला चित्ता जवळजवळ सात दशकांपूर्वी भारतात नामशेष झाला.

गेल्या वर्षी, कुनो येथे १२ बछड्यांचा जन्म झाला होता, परंतु तीन बछड्यांसह सहा बछडे जगले नाहीत. या वर्षी, सात फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान दोन चित्तांमध्ये नऊ बछड्यांचा जन्म झाला. २०२३ पासून कुनो येथे एकूण ३९ बछड्यांचा जन्म झाला आहे, त्यापैकी २७ जिवंत आहेत. नामिबियात जन्मलेल्या ज्वाला आणि आशा, दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या गामिनी, वीरा आणि निर्वा आणि भारतात जन्मलेल्या मुखी या सर्वांनी उद्यानात बछड्यांना जन्म दिला आहे.

# प्राजक्ताची पोस्ट चर्चेत



मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री म्हणून प्राजक्ता माळीकडे पाहिले जाते. प्राजक्ताने आजवर अनेक मराठी, हिंदी चित्रपट आणि वेबसिरीजमध्ये अभिनय केला आहे. प्रेक्षक तिच्या कामाचे नेहमी भरभरून कौतुक करत असतात. ती देखील नेहमी आपल्या भूमिकेतून काहीतरी नवीनी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न दरवेळी करत असते. सोशल मीडियावरील तिच्या पोस्टला तिचे चाहते कमेंट्स करत असतात. तिच्या अनेक पोस्ट विविध कारणांमुळे चर्चेतही असतात. नुकतीच अभिनेत्रीने अशी एक पोस्ट इंन्स्टाग्रावरून केली आहे, ज्यामुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. प्राजक्ता माळीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या व्हिडिओमध्ये प्राजक्ताने ”बाय बाय फोन... पुढच्या १५ दिवसांसाठी” असे कॅप्शन दिले आहे. साहजिक तिच्या कॅप्शनने चाहत्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे. या पोस्टमधून प्राजक्ताने पुढील १५ दिवस ब्रेक घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सध्या ती श्री श्री रविशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग या आश्रमात गेली आहे. तिथे जाऊन प्राजक्ता पुढील १५ दिवस अध्यात्मात तल्लीन होणार आहे. त्यामुळेच १५ दिवस फोनपासून ती दूर असणार आहे.

# तमिळ चित्रपटात दिसणार

# वामिका गब्बी



तमिळ चित्रपटसृष्टीत स्वतःचा वेगळा ठसा उमटवणारा ब्लॉकबस्टर दिग्दर्शक कनगरराज आता एका नव्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहे. मास्टर, कैथी, लियो, विक्रम आणि कूली यांसारख्या ॲक्शनप्रधान आणि थरारक चित्रपटांमुळे लोकेशला प्रचंड लोकप्रियता मिळाली. विशेषतः मास्टर, काइथि, आणि विक्रम या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई करत त्याला यशाच्या शिखरावर पोहोचवले. आता दिग्दर्शनानंतर तो अभिनेता म्हणून मोठ्या पडद्यावर पदार्पण करणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. लोकेशच्या अभिनयातील पहिल्या चित्रपटाचे नाव डीसी असे असून या चित्रपटाची पहिली झलक नुकतीच प्रदर्शित करण्यात आली आहे. या झलकने सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगवली आहे. रक्तपात, ॲक्शन आणि हिंसेने भरलेला हा टीझर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.

# हेजल किच जगतेय असं आयुष्य



बॉलिवूडमध्ये अनेक अशा अभिनेत्री आहेत ज्यांनी कमी कालावधीत किंवा छोट्या भूमिकांमधूनही प्रेक्षकांच्या मनात वेगळी छाप सोडली. त्यापैकी एक नाव म्हणजे हेजल किच. तिची ओळख आज केवळ अभिनेत्री म्हणून नाही, तर भारताचा माजी स्टार क्रिकेटर युवराज सिंह यांची पत्नी म्हणूनही आहे. मात्र, तिच्या अभिनय प्रवासाकडे पाहिल्यास ती स्वतःच्या कर्तृत्वावर लोकप्रिय झालेली अभिनेत्री आहे, हे स्पष्ट होते. २८ फेब्रुवारी १९८७ रोजी जन्मलेली हेजल कीच ही ब्रिटिश-मॉरिशियन वंशाची अभिनेत्री आणि मॉडेल आहे. तिचं मूळ नाव रोज डॉन असून, लग्नानंतर तिनं ‘गुरबसंत कौर’ हे नाव धारण केलं. भारतात येण्यापूर्वी तिनं विविध आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्येही काम केलं. विशेष म्हणजे, ती प्रसिद्ध हॉलिवूड चित्रपट मालिकेचा भागही राहिली आहे. हॅरी पॉटर द चेंबर ऑफ सीक्रेट (२००२) आणि हॅरी पॉटर अँड द ग्लोबल ऑफ फायर (२००५) या चित्रपटांमध्ये ती झलक स्वरूपात दिसली होती. या अनुभवामुळे तिच्या करिअरला आंतरराष्ट्रीय ओळख मिळाली. भारतात तिला खरी लोकप्रियता मिळाली ती २०११ मध्ये प्रदर्शित झालेल्या ब्लॉकबस्टर चित्रपट बॉडीगार्ड मुळे. या चित्रपटात सुपरस्टार सलमान खान आणि करीना कपूर मुख्य भूमिकेत होते. हेजलनं करिनाच्या जवळच्या मैत्रिणी ‘माया’ची भूमिका साकारली होती. जरी तिची भूमिका लहान असली तरी तिच्या सहज आणि निरागस अभिनयामुळे ती प्रेक्षकांच्या लक्षात राहिली. ‘माया’ या पात्राने चित्रपटात भावनिक वळण दिलं आणि त्यामुळेच हेजल कीचला मोठी प्रसिद्धी मिळाली. आजही अनेक चाहते तिला ‘माया’ म्हणूनच ओळखतात. ‘बॉडीगार्ड’ व्यतिरिक्त हेजलनं बिल्ला यांसारख्या चित्रपटांमध्येही काम केलं. तिची भूमिका मुख्य नायिकेची नसली तरी तिनं आपल्या अभिनयातून वेगळी छाप निर्माण केली. २०१५ मध्ये आलेल्या बंकी की क्रेजी बात या चित्रपटात ती शेवटची मोठ्या पडद्यावर दिसली. त्यानंतर तिनं चित्रपटसृष्टीपासून काहीसं अंतर ठेवण्याचा निर्णय घेतला. हेजलनं रिॲलिटी शो बिग बॉस ७ मध्येही सहभाग घेतला होता. या शोमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू प्रेक्षकांसमोर आली. तिचा साधेपणा, स्पष्टवक्तेपणा आणि आत्मविश्वास यामुळे ती अनेकांना आवडली. २०१६ मध्ये हेजल कीचनं युवराज सिंगसोबत विवाह केला. त्यांच्या विवाहसोहळ्याची चर्चा देशभर झाली होती. क्रिकेट आणि बॉलिवूड या दोन वेगवेगळ्या क्षेत्रांतील व्यक्तिमत्त्वांचा हा मिलाफ चाहत्यांसाठी विशेष आकर्षणाचा विषय ठरला. लग्नानंतर हेजलनं कुटुंबाला प्राधान्य देत अभिनय क्षेत्रापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. आज ती दोन मुलांची आई आहे आणि आपल्या वैवाहिक आयुष्याचा आनंद घेत आहे. १५ वर्षांनंतर ‘माया’च्या भूमिकेतील हेजलकडे पाहिल्यास तिच्या व्यक्तिमत्त्वात मोठा बदल जाणवतो. तिच्या लूकमध्ये, स्टाईलमध्ये आणि आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात परिपक्वता दिसते. मात्र, तिचं सौंदर्य आणि आत्मविश्वास आजही तितकाच कायम आहे.

# जम्मू-काश्मीरने रचला इतिहास

## 67 वर्षात पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी जिंकली; अकिब नबी ठरला सामनावीर

**महाईन्यूज । मुंबई**

**रणजी ट्रॉफी २०२५-२६ फायनल सामन्यामध्ये जम्मू-काश्मीर संघाने इतिहास रचला असून पहिल्यांदा ट्रॉफीवर नाव कोरलं आहे. जम्मू काश्मीर संघाने कर्नाटकविरूद्ध शेवटच्या दिवशी ५५० पेक्षा अधिक धावांची आघाडी घेतली. सामना ड्रॉ झाला पण पहिल्या डावातील आघाडीमुळे जम्मू काश्मीर संघाने चॅम्पियन ठरला आहे. जम्मू काश्मीरचे पहिले विजेतेपद असून ६७ वर्षांनी ही ऐतिहासिक कामगिरी घडली आहे.**




जम्मू काश्मीर संघाने १९५९-६० मध्ये पहिल्यांदा रणजी ट्रॉफीमध्ये भाग घेतला होता. तेव्हापासून ६७ वर्ष झालीत पण त्यांच्या संघाला एकदाही ट्रॉफी जिंकता आलेली नव्हती. रणजीमध्ये त्यांनी पहिला विजय १९८२-८३ मध्ये आपला पहिला सामना जिंकला होता. जम्मू काश्मीर संघाने टॉस जिंकत पहिल्यांदा बॅटींग करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्यांदा फलंदाजी करताना जम्मू काश्मीर संघाने ५८४ धावा केल्या होत्या. यामध्ये शुभम पुंदीर १२१ धावा, अब्दुल समद ६१ धावा, कन्हैया वाढवान ७० धावा, साहिल लोतरा ७२ धावां केल्या होत्या. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या कर्नाटक संघाला २९३ धावांवर जम्मूने गुंडाळलं होतं. माजी कर्णधार मयंक अगरवाल (१६० धावा) याच्या शतकाचे महत्त्वपूर्ण योगदान कर्नाटकच्या डावात होते. इतर फलंदाज मात्र सावधपवित्र्याने खेळू शकले नाहीत. अकिब नबी याच्या पाच विकेट्स मयंक अगरवाल याच्या शतकावर भारी पडल्या. कर्नाटकने शुक्रवारी सकाळी ५ बाद २२० धावांवरुन पुढे खेळायला सुरुवात केली. अगरवाल आणि कृतिक कृष्णा (३६) यांनी सहाव्या विकेटसाठी ८० पेक्षा जास्त धावांची भागीदारी केली. मात्र दुसरा नवा चेंडू घेतल्यानंतर कर्नाटकचे फलंदाज पुन्हा अपयशी ठरले. कर्नाटक त्यानंतर जम्मू-काश्मीरला दुसऱ्या डावात कमी धावसंख्येवर बाद करून चौथ्या डावात लक्ष्याचा पाठलाग करण्याची आशा बाळगून होता असे त्यांनी या मोसमात दोनदा केले आहे. कर्नाटकने चांगली सुरुवातही केली आणि जम्मू-काश्मीरच्या दोन फलंदाजांना ११ धावांवरच पॅव्हेलियनमध्ये धाडले. परंतु इक्बालने कर्णधार पारस डोगरासह तिसऱ्या विकेटसाठी ६१ धावांची आणि नंतर अब्दुल समद सोबत चौथ्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी केली. त्यानंतर अब्दुलही बाद झाल्यावर साहिला लोत्रा यांनी ४१५ चेंडूत १९७ धांवाची भागीदारी केली. कामरान इक्बाल नाबाद १० धावा आणि साहिला लोत्राने नाबाद १०१ धावा केल्या.

# भारत- पाकिस्तान पुन्हा आमनेसामने येणार?

**महाईन्यूज । मुंबई**

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत भारत- पाकिस्तान सामना होणार की नाही?अशी जोरदार चर्चा रंगली होती. अखेर पाकिस्तान क्रिकेट बोर्डला आयसीसीसमोर झुकावं लागलं. १५ फेब्रुवारीला कोलंबोत भारत-पाकिस्तान सामन्याचा थरार पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी विजयाची नोंद केली. आता दोन्ही संघ सुपर ८ फेरीतील सामने खेळण्यासाठी मैदानात उतरले आहेत. दोन्ही संघांना सेमीफायनलमध्ये जाण्याची सुवर्णसंधी आहे. दरम्यान क्रिकेट चाहत्यांना पुन्हा एकदा भारत- पकिस्तान सामन्याचा थरार पाहायला मिळू शकतो. दोन्ही संघांसाठी कसं असेल समीकरण?**




### पाकिस्तानचं समीकरण तळ्यात मळ्यात

भारतीय संघासाठी सेमीफायनलमध्ये जाण्याचं समीकरण अगदी सोपं आहे. पण पाकिस्तानचा संघ या स्पर्धेत हवी तशी कामगिरी करू शकलेला नाही. पाकिस्तानने सुपर ८ फेरीतील२ सामन्यांपैकी एक सामना गमावला आहे. तर एक सामना पावसामुळे गमावला होता. त्यामुळे पाकिस्तानचा संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे. या गटातून इंग्लंडचा संघ सेमीफायनलसाठी पात्र ठरला आहे. तर न्यूझीलंडलाही सेमीफायनलमध्ये जाण्याची संधी असणार आहे. तर श्रीलंकेचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

भारतीय संघाला जर सेमीफायनलमध्ये जायचं असेल,तर वेस्ट इंडिजला कुठल्याही परिस्थितीत पराभूत करावं लागणार आहे. तर पाकिस्तानसाठी सेमीफायनलमध्ये जाण्याचं समीकरण जरा कठिण आहे. पाकिस्तानचा सुपर ८ फेरीतील शेवटचा सामना श्रीलंकेविरूद्ध होणार आहे. पाकिस्तानला धावांचा बचाव करताना हा सामना ६५ किंवा त्यांहून अधिक धावांनी जिंकावा लागणार आहे. तर धावांचा पाठलाग करताना १३ षटकात सामना जिंकावा लागणार आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये सेमीफायनलचा सामना पाहायला मिळू शकतो. जर पाकिस्तानचा संघ गुणतालिकेत दुसऱ्या राहिला आणि भारतीय संघ आपल्या गटातून पहिल्या स्थानी गेला, तर दोन्ही संघांमध्ये सेमीफायनलचा सामना पाहायला मिळू शकतो. पण ही शक्यता खूप कमी आहे. कारण दक्षिण आफ्रिकेचा संघ अव्वल स्थानी विराजमान आहे. तर दुसरी शक्यता अशी की, दोन्ही संघांनी जर सेमीफायनलचा सामना जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला तर, तर फायनलमध्ये भारत- पाकिस्तान सामन्याचा थरार पाहायला मिळू शकतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 01 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## स्थायी समितीसमोर सादर : स्थायी समितीकडून बैठक तहकूब

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ५ हजार ६६० कोटींचा अर्थसंकल्प सादर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या ५ हजार ६६० कोटी ७३ लाख रुपयांच्या (आरंभीच्या शिल्लकेसह) अंदाजपत्रकाचे सादरीकरण आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांचेकडे केले. केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांसह हा अर्थसंकल्प ९ हजार ३२२ कोटी १७ लाख रुपयांचा असल्याची माहिती त्यांनी दिली.**

आयुक्त हर्डीकर यांनी सांगितले की, २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५,६६०.७३ कोटी रुपये उत्पन्न अपेक्षित असून त्यापैकी ५,६५५.७३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहेत. मार्च २०२७ अखेर ५ कोटी रुपये शिल्लक राहतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा नागरिक सहभाग उपक्रमांतर्गत दुप्पट म्हणजे सुमारे ४,९९६ सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २९७ सूचनांचा अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला आहे.

चालू व प्रस्तावित प्रकल्पांमध्ये नवीन प्रशासकीय इमारत, डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूल, मोशी रुग्णालय, थेरगाव येथील पीपीपी कर्करोग रुग्णालय, अग्निशमन प्रबोधिनी इमारत, मामुर्डी-सांगवडे/हिंजवडी पूल, ड्रेनेज मास्टर प्लॅन, पीसीएमसी सिटी सेंटर, अण्णासाहेब मगर स्टेडियम, हरित सेतू, टेल्को रोड एनएमटी प्रकल्प, पाणीपुरवठा सुधारणा (भामा आसखेड - अमृत २.०), प्रधानमंत्री आवास योजना, बायोडायव्हर्सिटी पार्क (तळवडे), मुळा व इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, मोशी कचरा डेपो बायोगॅस प्रकल्प, सांडपाणी पुनर्चक्रीकरण, एकात्मिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प आदींचा समावेश आहे.

## क्षेत्रीय विकासासाठी भरीव तरतूद

महापालिकेच्या अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत विकासकामांसाठी अनुक्रमे ६.२९ कोटी, ११.४९ कोटी, १०.२५ कोटी, ११.४४ कोटी, ३.७० कोटी, ९.३० कोटी, ५.२८ कोटी आणि ७.९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



## लोकाभिमुख आणि संतुलित विकासाचा आराखडा

हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा दस्तऐवज नसून शहराच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा ठोस आराखडा आहे. पायाभूत सुविधा, पर्यावरण, पाणीपुरवठा, सामाजिक न्याय आणि शाश्वत विकास यांना प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांसाठी जेंडर बजेट, दिव्यांगांसाठी कल्याणकारी तरतूद, शहरी गरीबांसाठी मोठा निधी आणि नागरिकांच्या सूचनांचा समावेश यामुळे हा अर्थसंकल्प लोकाभिमुख व उत्तरदायी प्रशासनाचे प्रतीक असल्याचा विश्वास आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केला.

## विभागनिहाय भांडवली खर्च

1. स्थापत्य विभाग - ७२७.९२ कोटी रुपये
2. भूसंपादन - १०० कोटी रुपये
3. विद्युत विभाग - ३२.७८ कोटी रुपये
4. पाणीपुरवठा - १५५.७३ कोटी रुपये
5. जलनि:सारण - १८.२६ कोटी रुपये
6. पर्यावरण विभाग - २४.३५ कोटी रुपये
7. 'प' अंदाजपत्रकांतर्गत कामे - ३४.१० कोटी रुपये

## अर्थसंकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये



1. विकासकामांसाठी एकूण १,१८६ कोटी रुपये
2. स्थापत्य विशेष योजनेसाठी ४३६.९४ कोटी रुपये
3. महापौर निधी - ५० कोटी रुपये
4. शहरी गरीब (बीएसयूपी) - १,९५३ कोटी रुपये
5. जेंडर बजेट - ९९ कोटी रुपये
6. दिव्यांग कल्याणकारी योजना - ६८.३० कोटी रुपये
7. पाणीपुरवठा भांडवली कामे - १५५.७३ कोटी रुपये
8. पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित (पीएमपीएमएल) - ४०० कोटी रुपये
9. भूसंपादन - १०० कोटी रुपये
10. अतिक्रमण निर्मूलन - १० कोटी रुपये
11. स्मार्ट सिटी - ५० कोटी रुपये
12. अमृत २.० योजना - ५४.४५ कोटी रुपये

# पद्मश्री रघुवीर तुकाराम खेडकर यांचा नागरी सन्मान

## मराठी भाषा गौरव दिनी महापालिकेकडून लोककलेसाठी आयुष्य अर्पण केलेल्या कलावंताला सलाम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्राची लोककला असलेल्या तमाशा क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर तुकाराम खेडकर यांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते मानपत्र, भक्ती-शक्ती समूह शिल्प प्रतिकृती तसेच, सन्मानचिन्ह देऊन नागरी सन्मान करण्यात आला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे शुक्रवारी कार्यक्रम झाला.**



### कलावंतांचा गौरव

कष्टकऱ्यांची उद्योगनगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेने माझा नागरी सन्मान करून प्रत्यक्षात सर्व कलावंतांचा गौरव केला आहे. आयुष्यभर ज्या कलेने मला ओळख दिली, त्या कलेच्या माध्यमातून मी पुढेही निष्ठापूर्वक लोकांची सेवा करत राहीन. पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तेव्हा मला खरंच धक्का बसला.

या कार्यक्रमास महापौर लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे तसेच, मारुती भापकर, अरुण बोऱ्हाडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, आयटीआयचे प्राचार्य शशिकांत पाटील, रघुवीर खेडकर यांचे सहकारी शफी शेख आदी उपस्थित होते. महापौर लांडगे म्हणाले की, खेडकर यांचे कार्य केवळ तमाशा या कलेपुरते मर्यादित नसून मराठी भाषा, संस्कृती आणि लोकपरंपरा जतन करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. अशा महान लोककलावंताचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. विरोधी पक्षनेते भोईर म्हणाले की, पद्मश्री रघुवीर तुकाराम खेडकर हे आधुनिक लोककलेची गंगोत्री आहेत. खेडकर म्हणजे महाराष्ट्र आणि लोककलेचे प्रतीक आहेत. तमाशा म्हटले की खेडकर यांचे नाव समोर येते. हा सन्मान केवळ त्यांचा नसून आपल्या संपूर्ण शहराचा सन्मान आहे. उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या की, महान लोककलावंताचा सन्मान होणे ही आपल्या शहरासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला निश्चितच प्रेरणा मिळेल. किरण गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. राजू मोहन यांनी सूत्रसंचालन केले. लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटरतर्फे माय मराठीची गौरवगाथा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. जय जय महाराष्ट्र माझा या गीताने कार्यक्रमाची सुरुवात होताच प्रेक्षागृहात महाराष्ट्रप्रेमाची लहर उसळली. विविधरंगी सादरीकरणांनी कार्यक्रम रंगत गेला. संदेश विठ्ठल उमप यांना प्रवीण डोणे, विजय कर्जावकर, धीरज पारकर, रागिणी मुंबईकर, कोमल दांडे, वैशाली गोखले, प्रज्ञा वळंजू या गायकांनी सुरेल साथ दिली. संतोष लिंबोरे यांनी निवेदन केले. शाहीर पृथ्वीराज माळी यांनीही दमदार आवाजातून पोवाडा सादर केला. त्यांना शाहीर अभंगराज माळी, अवधूत पवार, आदिती पवार यांनी साथ दिली. ढोलकीवर राजू घोलप यांच्या ठेक्यांनी सभागृह दणाणून गेले.

# पिंपरी चिंचवडमध्ये ३ ते ५ मार्चला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव; ११६ चित्रपटांचा सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी आणि गाथा फिल्म सोसायटी यांच्या वतीने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई, भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था, पुणे (एफटीआयआय) यांच्या सहकार्याने आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ३ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जागतिक दर्जाच्या चित्रपट महोत्सवास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.**

### ५ मार्च रोजी पारितोषिक समारंभ

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ अंतर्गत बुधवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी चित्रपट महोत्सवातील विविध स्पर्धा विभागांतील उत्कृष्ट चित्रपटांना सन्मानित करून पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. महोत्सवादरम्यान प्रदर्शित करण्यात आलेल्या लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट या विविध गटांमधील निवडक कलाकृतींना सन्मानित करण्यात येणार असून 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' या विशेष पुरस्काराचाही यावेळी प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास चित्रपटसृष्टीतील मान्यवर, परीक्षक तसेच सहभागी दिग्दर्शक व निर्माते उपस्थित राहणार आहेत.

पिंपरी चिंचवड शहरात आयोजित करण्यात येत असलेला हा महोत्सव एक भव्य, वैविध्यपूर्ण आणि आशयघन सांस्कृतिक सोहळा ठरणार असून यंदाच्या महोत्सवात तब्बल ४३ देशांमधील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील दर्जेदार कलाकृतींचा आस्वाद शहरातील चित्रपटप्रेमींना या महोत्सवाच्या माध्यमातून घेता येणार असून हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे.

महोत्सवात भारतासह अमेरिका, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, स्वित्झर्लंड, नेदरलँड्स, पोलंड, स्वीडन, सायप्रस, इटली, ट्युनिशिया, इजिप्त, मोरोक्को, लेबनॉन, पॅलेस्टाईन, चिली, ब्राझील, जपान, थायलंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशिया, दक्षिण कोरिया, अर्जेंटिना, मेक्सिको, तुर्की, इराण, दक्षिण आफ्रिका आणि ग्रीस आदी देशांचा सहभाग आहे. विविध खंडांतील देशांमधून आलेल्या चित्रपटांमुळे महोत्सवाला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

या महोत्सवात लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट अशा विविध प्रकारच्या चित्रपटांचा समावेश असून सर्व वयोगटातील प्रेक्षकांना लक्षात घेऊन चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक चित्रपटातून समाजमनाला स्पर्श करणारे आणि विचारप्रवर्तक विषय प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत.

महोत्सवात सादर होणाऱ्या चित्रपटांमधून विज्ञान आणि अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, समाजव्यवस्था, निसर्ग व पर्यावरण, तंत्रज्ञान, प्रेम व मानवी भावना, महापूर व आपत्ती व्यवस्थापन तसेच महापुरुषांच्या जीवनावर आधारित असे विविध विषय मांडण्यात आले आहेत. याशिवाय शिक्षण व ज्ञानप्रबोधन, महिला सक्षमीकरण व लैंगिक समानता, युवा नेतृत्व विकास, ग्रामीण विकास व शाश्वत प्रगती, सामाजिक समता व मानवाधिकार, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य जनजागृती, बालहक्क, कला व लोकसंस्कृती संवर्धन, उद्योजकता व नवकल्पना, जागतिक शांतता, दिव्यांग सक्षमीकरण, क्रीडा प्रेरणा, हवामान बदल जनजागृती आणि कुटुंब व्यवस्थेतील मूल्ये अशा सकारात्मक व समाजाभिमुख विषयांचाही देखील समावेश आहे.

चित्रपट क्षेत्रात महिलांना अधिक संधी आणि व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने महोत्सवात 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महिला दिग्दर्शकांच्या सर्जनशीलतेचा गौरव करण्याचा हा उपक्रम विशेष लक्षवेधी ठरणार आहे. याशिवाय, 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा शहराच्या सांस्कृतिक समृद्धीत भर घालणारा आणि नव्या विचारांना चालना देणारा उपक्रम ठरणार आहे.


# एमआईटी कॉलेज मध्ये 'तंत्रज्ञान तयारी व उत्पादन तयारी

## शिक्षण विश्व: विकासाची दुहेरी किल्ली' कार्यशाळा उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**EATON RESEARCH LABSच्या सहकार्याने एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथील इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (IIC) व संशोधन व विकास (R&D) सेल यांच्या संयुक्त विद्यमाने "तंत्रज्ञान तयारी व उत्पादन तयारी : विकासाची दुहेरी किल्ली" या विषयावर विशेष प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली.**






महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी १०.०० वाजता आयोजित या कार्यशाळेत नवोपक्रम विकासाची संपूर्ण प्रक्रिया, तंत्रज्ञान सज्जता स्तर (TECHNOLOGY READINESS LEVEL – TRL) व उत्पादन सज्जता स्तर (MANUFACTURING READINESS LEVEL – MRL) यांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच प्रयोगशाळेत विकसित तंत्रज्ञानाच्या व्यावसायिकीकरणासाठी आवश्यक असलेल्या आयएसओ प्रमाणपत्र प्रक्रियेबाबतही माहिती देण्यात आली.

कार्यशाळेसाठी डॉ. सचिन वडिखाये (इनोव्हेशन मॅनेजर) प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी प्रयोगशाळेतील संशोधन उद्योगक्षेत्रात प्रभावीपणे रूपांतरित करण्याच्या पद्धती, तंत्रज्ञान हस्तांतरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी, तसेच उद्योग-संस्था सहकार्य यावर सखोल विवेचन केले. त्यांच्या संवादात्मक सत्राला विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी मार्गदर्शन केले, तर उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. वंदना पगार यांनी जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. डॉ. वैशाली खेरडेकर (अधिष्ठाता, संशोधन व विकास), तसेच IIC समन्वयक डॉ. संदीप धवळे आणि सर्व सदस्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेला विविध शाखांतील विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण १३० सहभागी उपस्थित होते. नवोपक्रम, संशोधन आणि उद्योजकतेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

> "आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात केवळ संशोधन पुरेसे नाही, तर त्या संशोधनाला उद्योगक्षम उत्पादनामध्ये रूपांतरित करण्याची तयारी तितकीच महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान सज्जता स्तर (TRL) आणि उत्पादन सज्जता स्तर (MRL) यांची सखोल समज विद्यार्थ्यांना नवोपक्रमातून उद्योजकतेकडे वाटचाल करण्यासाठी सक्षम करते. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची दृष्टी, गुणवत्ता मानकांची जाणीव आणि उद्योगाशी प्रभावी संवाद साधण्याची क्षमता विकसित होते. महाविद्यालयाने संशोधन व नवोपक्रमाला चालना देण्यासाठी सातत्याने अशा उपक्रमांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे."
>
> **- डॉ. बी. बी. वाफारे, संचालक.**

# एमआयटी महाविद्यालयात 'एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**एम.आय.टी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात "एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज – CONVERSATIONS WITH YOUNG ENTREPRENEURS" या उपक्रमाचे सेमिनार हॉलमध्ये यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी मार्गदर्शन मिळावे, स्टार्टअप संस्कृतीची ओळख व्हावी आणि नवकल्पनांना चालना मिळावी हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.**



हा उपक्रम SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY आणि संबंधित महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दोन स्वतंत्र व परिणामकारक सत्रांमध्ये अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. कार्यक्रमात दोन युवा व यशस्वी उद्योजकांच्या संवादात्मक तसेच प्रेरणादायी सत्रांचे विशेष आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात श्री. संकेत फलाक (FOUNDER & DIRECTOR, POWERED SPORTS TECH) यांनी आपल्या स्टार्टअपच्या प्रारंभापासून ते आजवरच्या प्रवासाचा सविस्तर आढावा घेत नवकल्पना, व्यवसाय उभारताना येणाऱ्या अडचणी, आव्हाने आणि उपलब्ध संधी याविषयी अनुभव कथन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना चिकाटी, सातत्यपूर्ण परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचारसरणीचे महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले.

दुसऱ्या सत्रात श्री. धनेश पवार आणि शोईब शेख (CEO व FOUNDER, PRESKILET) यांनी कौशल्यविकास, डिजिटल परिवर्तन, आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका आणि युवा पिढीतील उद्योजकीय दृष्टीकोन या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे, बदलत्या काळानुसार स्वतःला अद्ययावत ठेवणे आणि सातत्याने शिकत राहणे हे यशाचे प्रमुख सूत्र असल्याचे त्यांनी ठळकपणे अधोरेखित केले. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त, सक्रिय आणि जिज्ञासूपूर्ण सहभाग लाभला. प्रश्नोत्तर सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी थेट उद्योजकांशी संवाद साधत स्टार्टअप क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव, संधी आणि आव्हाने याविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन झेंडे व सौ. तृप्ती निगडीकर यांनी काटेकोर नियोजनासह कामकाज पाहिले, तर आयआयसी संयोजक डॉ. संदीप ढवळे यांनी संपूर्ण उपक्रमात महत्त्वपूर्ण व सक्रिय भूमिका पार पाडली. डॉ. अक्षदा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अत्यंत यशस्वी व परिणामकारक ठरला.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांनी सांगितले की, "हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला असून उद्योजकतेकडे करिअरच्या सक्षम व आशादायी पर्यायाच्या दृष्टीने पाहण्यास प्रोत्साहन देणारा आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचा स्टार्टअप सुरू करण्यासाठी पुढाकार घेऊन आत्मविश्वासाने पुढे यावे. कॅम्पसमध्ये नवोन्मेषी, सर्जनशील आणि उद्योजकतेला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यापीठाचे सहकार्य निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे." या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी सकारात्मक, व्यापक आणि दूरदृष्टीपूर्ण दृष्टिकोन निर्माण झाला असून महाविद्यालयात स्टार्टअप संस्कृतीला निश्चितच चालना मिळाल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

> "आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ नोकरीचा विचार न करता विद्यार्थ्यांनी उद्योजकतेकडे करिअरचा सक्षम पर्याय म्हणून पाहणे गरजेचे आहे. 'एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज'सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या विचारांना नवी दिशा देतात आणि नवकल्पनांना चालना देतात. महाविद्यालयात नवोन्मेषी वातावरण निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःचा स्टार्टअप उभारण्यासाठी प्रोत्साहित करणे हीच आमची भूमिका आहे.
>
> **- डॉ. बी. बी. वाफारे, संचालक.**

# GBSRC Hosts 5th International Conference on Digital Transformation & Green Growth

**MahaEnews I PUNE**

**FEBRUARY 27, 2026: THE GLOBAL BUSINESS SCHOOL AND RESEARCH CENTRE (GBSRC), UNDER THE AEGIS OF DR. D. Y. PATIL VIDYAPEETH, PUNE, SUCCESSFULLY CONCLUDED ITS 5TH INTERNATIONAL CONFERENCE ON FEBRUARY 26–27, 2026. THE CONFERENCE, THEMED "DIGITAL TRANSFORMATION & GREEN GROWTH: BRIDGING TECHNOLOGY, BUSINESS AND POLICY FOR A RESILIENT WORLD," BROUGHT TOGETHER GLOBAL ACADEMICIANS, INDUSTRY LEADERS, POLICYMAKERS, AND RESEARCHERS ON A DYNAMIC VIRTUAL PLATFORM.**




The two-day international conference served as a vibrant forum for deliberations on the intersection of innovation, sustainability, and governance. Scholars and practitioners from multiple countries participated in insightful discussions on how digital transformation and green growth can collaboratively build a resilient and sustainable global economy. All accepted and presented research papers will be published in Taylor & Francis Scopus-indexed conference proceedings, offering participants significant academic visibility and global recognition.

The conference was organized under the visionary leadership and guidance of Dr. P.D. Patil, Hon'ble Chancellor; Dr. Bhagyashree Patil, Pro Chancellor; Dr. Smita Jadhav, Hon'ble Secretary and Pro-Vice Chancellor Dr. D.Y. Patil Vidyapeeth Society; and Dr. N.J. Pawar, Vice Chancellor of Dr. D. Y. Patil Vidyapeeth. Their continued emphasis on research excellence and global engagement was reflected in the remarkable scale and impact of the event, which witnessed participation from 12 countries, the presentation of 135 research papers, and the presence of 26 distinguished national and international resource persons, making it a truly global platform for academic exchange and collaborative dialogue.

The conference witnessed an impressive lineup of distinguished national and international speakers. Among the eminent dignitaries were Bhimaraya Metri, Director of Indian Institute of Management Nagpur; Dr. Shrikant Patil, CEO of Maharashtra State Innovation Society; Prof. Bernardo Nicoletti from Temple University Rome; and Dr. Rameshwar Dubey from Montpellier Business School were the eminent speakers who delivered compelling perspectives on technology-driven growth and innovation ecosystems. It commenced with a visionary welcome address by Dr. N. J. Pawar, Hon'ble Vice Chancellor of Dr. D. Y. Patil Vidyapeeth (DPU), who articulated the thought and purpose behind organizing the international conference. He emphasized the institution's commitment to fostering dialogue at the intersection of technology, business, and policy, while highlighting DPU's academic excellence, global collaborations, research advancements, and its growing reputation as a hub for innovation-driven education. His address set the tone for meaningful deliberations aimed at building a resilient and future-ready ecosystem. Dr. Smita Jadhav, Hon'ble Secretary and Pro-Vice Chancellor Dr. D.Y. Patil Vidyapeeth Society; highlighted the ITC e-Choupal model as a landmark example of bridging technology with business intelligence to empower farmers, enhance transparency, and create inclusive market linkages. Building on the theme of technology-driven empowerment at the grassroots level, the discussion then expanded to India's broader research and digital advancement landscape Prof. Bhimaraya Metri emphasized India's immense prospects in research and development, noting that digital upgradation through emerging technologies such as 3D Printing and Artificial Intelligence can position the nation as a global innovation hub. Extending this conversation from digital capability to structured innovation frameworks, the focus then shifted to ecosystem development and commercialization Dr. Shrikant Patil stressed the strategic importance of innovation in rare earth sectors, district-level micro incubators, and effective patent commercialization through sustainable ecosystems fostered by the Maharashtra State Innovation Society. Providing an international outlook, Dr. Bernardo Nicoletti discussed AI's predictive, generative, agentic, and embedded capacities, underscoring its transformative role in shaping intelligent enterprises and future-ready economies.

The global dimension of the conference was further strengthened by speakers including Dr. Soniya Billore from Linnaeus University; Dr. Sudhashini Nair from SEGi University; Dr. Dorsa Heidari of iBishop, Iran; Dr. Firoz Khan from Westford University College; Mr. David K K from Tongmyong University; Dr. Seth S. Frei from Texas State University; Dr. Deepti Soni from Mashtech Infotrellis, Canada; and Dr. Preeti Wadhwa from George Brown College.

Indian academic leaders who addressed the conference included Dr. Manjula Jain from Tirthankar Mahaveer University; Dr. K. Mathiyazhagan from Thiagarajar School of Management; Dr. Vani Laturkar from Swami Ramanand Teerth Marathwada University; Dr. Rajiv Thakur from Mandsaur University; Dr. Kartik Dave from Dr. B. R. Ambedkar University; Dr. Gurdip Singh Batra from Desh Bhagat University; and Dr. Chandrahauns Chavan from Jamnalal Bajaj Institute of Management Studies.

Industry experts also enriched the sessions, including representatives from Akkodis, Mindwrks Global Technologies, PMI Pune-Deccan India Chapter, and HR leaders from the UAE, ensuring a strong academia–industry interface.

The conference addressed pressing global challenges through sub-themes such as Sustainable Business Models and Circular Economy, Digital Transformation and Industry 5.0, Green Technologies and Climate Resilience, AI and Big Data for Sustainable Development, Policy and Governance for Sustainable Development, Entrepreneurship and Sustainable Startups, Ethical Tech and Responsible Innovation, and cross-disciplinary approaches. Special emphasis was placed on the sustainability of internationalization in higher education.

Dr. Sachin Vernekar, Conference Chairperson and Professor Emeritus (Advisory) & Research Head at GBSRC, along with Dr. Manish Sinha, Conference Convenor and Director of GBSRC, highlighted the conference's role in fostering cross-sectoral collaborations aligned with the United Nations Sustainable Development Goals. They emphasized that the deliberations would contribute meaningfully toward building a resilient, inclusive, and decarbonized global future.

The successful culmination of the 5th International Conference reaffirmed GBSRC's commitment to academic excellence, global partnerships, and transformative research aimed at bridging theory and practice in the pursuit of sustainable development.